महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.८९५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०८ दिनांक ०८ / ०९ / २०२०

**विषय :** सन २०२० - २०२१ या वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना औद्योगिक प्रशिक्षण देणे बाबत.

........

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ तदनंतर महावितरण कंपनीतील वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे परिशिष्ट 'ज' मधील तरतुदीनुसार मृत/ वैद्यकीयदृष्टया अपात्र व असमर्थ ठरवून त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असतील असे कर्मचारी तसेच कंपनीचे काम करीत असताना अप्राणांतिक अपघातामुळे सेवा करण्यास असमर्थ झाल्याने सेवा समाप्त केलेले कर्मचारी यांच्या अवलंबितांना अनुकंपा तत्वावर त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार त्या त्या पदांचा अनुशेष व रिक्त पदे विचारात घेऊन त्यांच्या ज्येष्ठतेनुसार महावितरण कंपनीत सामावून घेतले जाते.

२. मृत/ वैद्यकीय दृष्टया अपात्र व असमर्थ ठरवून त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असतील असे कर्मचारी तसेच कंपनीचे काम करीत असताना अप्राणांतिक अपघातामुळे सेवा करण्यास असमर्थ झाल्याने सेवा समाप्त केलेले कर्मचारी यांचे अर्हतारहीत अवलंबित (Non-qualified dependent) हे तांत्रिक संवर्गातील "विद्युत सहाय्यक (तंत्रज्ञ)" या पदावर नोकरी मिळणेसाठी पात्र होत नाहीत. त्या अनुषंगाने त्या अवलंबितांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थे अंतर्गत प्रशिक्षण देण्याबाबत सामान्य आदेश क्र. १५९ (कर्मचारीवर्ग) दि. ३०.०६.२००४ अन्वये योजना (ITI Sandwich Course) आखण्यात आलेली होती.

३. महावितरण कंपनीने शासन स्तरावर कंपनीचे पत्र क्र. HRD/O&M/FN-८९५/११०५ Dt. १३.०१.२०२० अन्वये पाठपुरावा केला. मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना तारतंत्री या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण देण्याकरीता राज्यातील २७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रत्येकी २१ प्रवेश क्षमतेप्रमाणे तारतंत्री व्यवसायाची १ तुकडी अशा एकूण २७ तुकडयामधून सप्टेंबर, २०२० पासून सन २०२०-२१ या शैक्षणिक सत्रामध्ये **एक वेळची विशेष बाब** म्हणून SCVT अंतर्गत प्रशिक्षण देण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे. यासाठी महावितरण कंपनीसाठी स्वतंत्र शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२०२०/प्र.क्र. १५४/व्यशि-३ दिनांक १७.०८.२०२० निर्गमित करण्यात आला आहे. सदरचा शासन निर्णय फक्त महावितरण कंपनीमधील अवलंबित यांच्यासाठी लागू आहे.

४. शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२०२०/प्र.क्र. १५४/व्यशि-३ दिनांक १७.०८.२०२० च्या धर्तीवर महावितरण कंपनी मधील मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना तारतंत्री या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

i) या योजनेनुसार जे अवलंबित इयत्ता ७ वी उत्तिर्ण अथवा त्यावरील शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत त्यांना या योजनेअंतर्गत प्रशिक्षणास पाठविण्यात यावे.

ii) या योजने अंतर्गत प्रशिक्षणाच्या एका वर्षाचे शुल्क रु. २५०००/- प्रति उमेदवारास (per candidate) असे राहील.

iii) यानुसार सुरुवातीला या प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेले शुल्क हे महावितरण कंपनीमार्फत भरण्यात येईल. त्यानंतर सदर शुल्क अवलंबित कायम पदावर कंपनीमध्ये रुजू झाल्यानंतर त्यांच्या मासिक वेतनातून २५ हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

iv) या योजनेचा लाभ घेण्यासाठी अवलंबितांनी महावितरण कंपनीमधील नियमित पदावर कार्यरत असणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांचे अथवा आर्थिकदृष्टया सबळ असलेल्या दोन लोकांकडून रु १००/- चे हमीपत्र (Surety Bond) सादर करणे बंधनकारक आहे.

v) सदर योजनेमध्ये प्रशिक्षणास पाठविण्यात येणाऱ्या अवलंबिताचा संमत्ती अर्ज शक्य तेवढया लवकर परंतू दि. १८.०९.२०२० या दिनांकाच्या अखेरीस कार्यालयास प्राप्त झालेला असावा. तसेच वीज वितरण व्यवस्थेच्या संवसु विभागाच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता उमेदवारांच्या वयाची कमाल मर्यादा अट दि. १८.०९.२०२० रोजी ३३ वर्षे अशी राहील.

vi) सदर प्रशिक्षणाचा कालावधी सप्टेंबर २०२०-२१ असा १ वर्षाचा असेल.

vii) जे अवलंबित १२ वी + एमएससीआयटी (MS-CIT) अथवा पदवीधारक + एमएससीआयटी (MS-CIT) आहेत त्यांचा शैक्षणिक पात्रतेनुसार असणारा अतांत्रिक पदावरील नोकरी मागणीचा अर्ज अबाधित राहील, भविष्यात सदर पदाचा अनुशेष आणि रिक्तपदे उपलब्ध झाल्यास त्या पदावर ज्येष्ठताक्रमानुसार नियुक्ती देता येईल.

viii) १२ वी + एमएससीआयटी (MS-CIT) अथवा पदवीधारक + एमएससीआयटी (MS-CIT) उमेदवारांना पात्रतेनुसार भविष्यात नव्याने नियुक्ती दिल्यानंतर त्यांचा या योजनेंतर्गत '**विद्युत सहाय्यक**' पदावरील कालावधी सेवासंबंधी कोणत्याही लाभास पात्र धरण्यात येणार नाही.

ix) तंत्रज्ञ पदावर रूजू झाल्यानंतर अतांत्रिक पदावर नव्याने नियुक्ती देण्यात आली तर तंत्रज्ञ पदाचे वेतन संरक्षित (Pay Protect) राहील. तसेच तंत्रज्ञ पदावरील सेवा कालावधी फक्त अंतिम रजा रोखीकरण व उपदानाकरीताच ग्राहय धरण्यात येईल.

x) या औद्योगिक प्रशिक्षणानंतर उमेदवारास विद्युत सहाय्यक या पदावर त्वरीत सामावुन घेणेबाबतचा हक्क सांगता येणार नाही.

xi) उमेदवारास औद्योगिक प्रशिक्षण यशस्वी रित्या पुर्ण केल्या नंतर त्यावेळेस क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उपलब्ध असणारी रिक्तपदे व अनुशेषानुसार **विद्युत सहाय्यक** पदी कंत्राटी पध्दतीने नेमणुक देण्यात येईल.

xii) सदर औद्योगिक प्रशिक्षणासाठी अवलंबितांनी त्यांची रहाण्याची (Lodging & Boarding) व प्रवासाची व्यवस्था स्वखर्चाने करावयाची आहे.

**xiii) अवलंबिताने सदर औद्योगिक प्रशिक्षणाची परीक्षा सलग चार प्रयत्नांत (Attempt) (१+३ प्रयत्न) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. यानंतरही अनुतिर्ण राहणाऱ्या उमेदवाराचा मासिक अर्थलाभ (MMB) बंद करण्यात येईल व त्याच्याकडून प्रशिक्षणाचा खर्च देखील वसूल करण्यात येईल.**

xiv) सामान्य आदेश क्र. १५९ (क) दि. ३०.०६.२००४ प्रशासकीय परिपत्रक क्र. ४२५ दि. ०७.०८.२००४ त्यांस दुरूस्ती चिठ्ठी क्र. ०१ दि. २२.०३.२००५, प्रशासकीय परिपत्रक क्र. १०३ दि. २५.०४.२००७, प्रशासकीय परिपत्रक क्र. १६१ दि. १४.०७.२००८, प्रशासकीय परिपत्रक क्र. २४० दि. २४.०८.२००९, प्रशासकीय परिपत्रक क्र. ३२६ दि. २७.१२.२०१० आणि प्रशासकीय परिपत्रक क्र. ४६० दि. २४.०६.२०१३ मध्ये अंतर्भूत इतर अटी व शर्ती कर्मचाऱ्यांच्या अंवलबित प्रशिक्षणार्थी यास लागू राहतील.

५. संबधीत परिमंडल कार्यालयातील मुख्य अभियंता यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांची नावे दि. २५.०९.२०२० पर्यंत मुख्य कार्यालयास कळवावीत.

**सोबत** - शासन निर्णय दि. १७.०८.२०२०.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडे अनुकंपा तत्त्वावर नेमणूक करावयाच्या उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तारतंत्री व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : आयटीआय-२०२०/प्र.क्र.१५४/व्यशि-३,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२०.

**वाचा :-** संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २०/सीटीएस/२०१२/३२६, दि.३१ ऑगस्ट, २०१२.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडे अनुकंपा तत्त्वावर नेमणूक करावयाच्या उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तारतंत्री व्यवसायाचे प्रशिक्षण सन २०१३ ते २०१४ या कालावधीमध्ये देण्यात आले होते. त्याच धर्तीवर विविध कारणामुळे सदर प्रशिक्षण न मिळालेल्या व नवीन निर्माण झालेल्या मृत कर्मचाऱ्यांच्या अर्हताकविरहित अवलंबितांना तारतंत्री व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी विनंती केली होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मृत कर्मचाऱ्यांच्या अथवा कायमस्वरुपी विकलांग झालेल्या कर्मचाऱ्यांच्या ५६९ अर्हताविरहित अवलंबितांना सन २०२०-२१ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून तारतंत्री व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडील मृत कर्मचाऱ्यांच्या अर्हताविरहित अवलंबितांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तारतंत्री या ०१ वर्ष कालावधीच्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्याकरिता विद्युत परिमंडळाच्या परिसराजवळ जेथे हे प्रशिक्षण देणे शक्य आहे, अशा २७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रत्येक २१ प्रवेश क्षमतेप्रमाणे (सुपरन्युमरीसह), तारतंत्री व्यवसायाची १ तुकडी अशा एकूण २७ तुकडयामधून सप्टेंबर, २०२० पासून सन २०२०-२१ या शैक्षणिक सत्रामध्ये एक वेळची विशेष बाब म्हणून SCVT अंतर्गत प्रशिक्षण देण्यास खालील अटी व शर्ती अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांनी शिफारस केलेल्या उमेदवारांना विहित नियमानुसार प्रवेश देण्यात येऊन प्रशिक्षणासंबंधी आवश्यक ती सर्व व्यवस्था, संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी करावी.

२) प्रस्तावित तारतंत्री व्यवसायाच्या २७ तुकड्यांसाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दि.१५.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सैध्दांतिक व तासिक घेण्यासाठी तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या निदेशकांचे मानधन निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या निदेशकांना मानधन अनुज्ञेय राहील.

३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१४.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील खाजगी व शासकीय औद्योगिक व प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षण शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार बिगर मशिन गटासाठी प्रतिवर्षी प्रति विद्यार्थी रु. २५०००/- इतके शुल्क निश्चित आहे. त्यानुसार तारतंत्री व्यवसाय अभ्यासक्रमासाठी प्रति वर्षी प्रति विद्यार्थी रु. २५०००/- इतके शुल्क महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्यातर्फे अदा करण्यात येईल.

४) सदर प्रशिक्षणाकरिता कडून कोणतीही आर्थिक तरतूद उपलब्ध केली जाणार नाही.

५) या प्रशिक्षण कालावधीच्या अनुषंगाने आवश्यक असणारा वेतन, कार्यालयीन खर्च, कच्चामाल, ओव्हरहेड चार्जेस, टुलकिट्स, संस्था विकास निधी या बाबींकरिता लागणारा खर्च हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या प्रशिक्षण शुल्कातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००८१८११४११६४५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dr Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Dr Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, cn=Dr Suvarna Siddharth Kharat
Date: 2020.08.18 12:09:42 +05'30'

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, प्लॉट नं. जी-९, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१.
३. सर्व सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय (संचालनालयामार्फत).
४. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (संचालनालयामार्फत).
५. संबंधित सर्व प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (संचालनालयामार्फत).
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत).
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, (व्यशि-३), मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (व्यशि-३), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

महावितरण या कंपनीत अनुकंपा तत्वावर नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या तारतंत्री या एक वर्ष कालावधच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणे.

| अ.क्र. | महावितरणचे परिमंडळ | अवलंबितांची संख्या | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नांव | तारतंत्री व्यवसाय अभ्यासक्रमाची नवीन तुकडी | प्रवेश क्षमता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ५३ | अमरावती | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| | | | धामणगाव | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची दुसरी तुकडी प्रस्तावित |
| २ | अकोला | ४२ | अकोला | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| | | | बालापूर | १ | २१ | तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| ३ | औरंगाबाद | २७ | औरंगाबाद | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| ४ | भांडुप व कल्याण | १९ | अंबरनाथ | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसरी तुकडी प्रस्तावित |
| ५ | बारामती | ३२ | मालेगांव (ब्रु) | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसरी तुकडी प्रस्तावित |
| | | | पुरंदर | १ | २१ | विजतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| ६ | चंद्रपूर | ३८ | चंद्रपूर | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसरी तुकडी प्रस्तावित |
| | | | गडचिरोली | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसरी तुकडी प्रस्तावित |
| ७ | गोंदीया | २१ | भंडारा | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची दुसरी तुकडी प्रस्तावित |
| ८ | जळगांव | ६२ | जळगांव | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसरी तुकडी प्रस्तावित |
| | | | धुळे | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| | | | नंदुरबार | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |

| अ.क्र. | महावितरणचे परिमंडळ | अवलंबितांची संख्या | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नांव | तारतंत्री व्यवसाय अभ्यासक्रमाची नवीन तुकडी | प्रवेश क्षमता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | कोल्हापूर | ६२ | कोल्हापूर | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| | | | सांगली | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| | | | सातारा | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत पाचवी तुकडी प्रस्तावित |
| १० | लातूर | ४६ | लातूर | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत पाचवी तुकडी प्रस्तावित |
| | | | बींड | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत तिसरी तुकडी प्रस्तावित |
| ११ | नागपूर | ८२ | नागपूर | २ | ४२ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत पाचवी व सहावी तुकडी प्रस्तावित |
| | | | वर्धा | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत तिसरी तुकडी प्रस्तावित |
| | | | उमरेड | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| १२ | नांदेड | २७ | नांदेड | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत तिसरी तुकडी प्रस्तावित |
| १३ | नाशिक | २९ | अहमदनगर | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत तिसरी तुकडी प्रस्तावित |
| १४ | पुणे | १४ | औध (पुणे) | १ | २१ | विजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करणे |
| १५ | रत्नागिरी | १५ | रत्नागिरी | १ | २१ | तारतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमांची तिसऱ्या पाळीत तिसरी तुकडी प्रस्तावित |
| | | ५६९ | | २७ | ५६७ | |

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Dist.Co.Ltd
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645

Maharashtra State Electricity Distribution Co.Ltd
Estrella Batteries Expansion Building,
Ground Floor, Plot No. 1, Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019.
Tel. No.: 022-24077441Fax No. : 022-2402576
Website : www.mahadiscom.in
E-mail :cgmp@mahadiscom.in

HRD/O&M/F.No.09/14715 Date: 9/9/2020

**To,**

**1) The Chief Engineer (Dist.), M.S.E.D.C.Ltd. Zone Office,**
**Amravati/ Akola/ Aurangabad/ Bhandup/ Baramati/Chandrapur/ Gondia/ Jalgaon/ Kalyan/ Kolhapur/ Konkan (Ratnagiri)/ Latur/ Nagpur/ Nashik/ Nanded/ Pune.**

**2) The Chief Engineer (T&S), M.S.E.D.C.Ltd. Eklahare, Nashik.**

**3) The Chief Engineer (Civil), M.S.E.D.C.Ltd, Pune.**

**Sub.: Training scheme for non-qualified dependents of the deceased employees of MSEDCL for the year 2020-21.**

**Ref.: 1) G.O. 159 (P) Dt. 30/06/2004.**
**2) MSEDCL Administrative Circular No. 608 Dt. 08.09.2020**

As per the provisions of General Order 159(P) Dt. 30.06.2004, it is decided to impart the 52 weeks ITI training to such of the non-qualified dependent of deceased employees, who have passed 7th Std. examination and above upto Graduation under the training scheme prepared by the Director, Vocational Training & Education. On the same lines, the proposal for providing training to the non-qualified dependents of the deceased employees of the MSEDCL employees in the year 2020-21, was under consideration of the Company. Now, the training for the year 2020-21 is notified vide the ADM Circular under reference no. 02.

2. Therefore, you are kindly requested to arrange to send updated information in the prescribed format **(in excel form only)** enclosed herewith, regarding number of dependents of the deceased employees, eligible for ITI training course under your jurisdiction by e-mail to agmhrom@gmail.com **on or before 25.09.2020** so as to arrange the ITI training for the year 2020-21 session in consultation with the Director, Vocational Training and Education, Mumbai.

**Enclosed: As per above.**

**(Cdr. Shivaji Indalkar)(*Retd.*)**
**Chief General Manager (HR)**

Copy s.w.r.to.

1) Jt. Managing Director, MSEDCL, Regional Office, Aurangabad/ Konkan (Ratnagiri)
2) Regional Director, MSEDCL, Regional Office, Nagpur/ Pune.
3) Director (HR), MSEDCL, HO, Prakashgad, Bandra (E) Mumbai -51

Copy w. c.

Chief General Manager (T/E), MSEDCL, HO, Prakashgad, Bandra (E) Mumbai -51

Copy to.:

General Manager (HR) MSEDCL, HO, Prakashgad, Bandra (E) Mumbai -51

FORMAT

## MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COM. LTD.

Name of Zone:-

Statement showing the details of the dependents of deceased employees to be sent for ITI training under provision of G.O.159 Dt. 30/06/2004 for year 2020-21

| Sr. No | Full Name of the dependent | Name of the deceased employee | Relation of the dependent | Educational qualification acquired | Caste | Date of Birth and Gender | Age as on 08/09/2020 (Date of ADM under ref. no. 02) | Address in short | Date of application of the dependent for employment | Whether MMB is granted or not | Whether consent given to work as Vidhyut Sahayak. | ITI Preferred by Candidate | Remark (If any) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

Data Summary

1) Total Candidates =
2) Male Candidates =
3) Female Candidates =
4) 7th Pass Candidates =
5) 12th + MSCIT Candidates =
6) Graduation + MACIT Candidates =